रयत शिक्षण संस्थेचे,

# अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर,

## राष्ट्रीय सेवा योजना

**विशेष श्रम संस्कार शिबीर कार्यक्रम**

नागापूर ( थापलिंग), ता.आंबेगाव, जि.पुणे

**अहवाल सन २०२१–२०२२**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये आमच्या महाविद्यालयाला १५० स्वयंसेवकांची तीन युनिटे मंजूर केलेली होती. त्यापैकी विशेष शिबीरासाठी १५० स्वयंसेवकांना मान्यता देण्यात आली होती.

आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष हिवाळी शिबीर दिनांक २ मार्च २०२२ ते ८ मार्च २०२२ या कालावधीत आंबेगांव तालुक्यातील दत्तक गाव नागापूर या गावी यशस्वीपणे संपन्न झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन महा. विकास समितीचे सदस्य श्री. उदय पाटील , प्राचार्य डॉ. के.जी कानडे यांचे हस्ते झाले. शिबीरात ९८ स्वयंसेविका ५२ स्वयंसेवक असे एकुण **१५०** स्वयंसेवक सहभागी झाले होते.

**"स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान"** हि संकल्पना शिबीर काळात राबविण्यात आली.ग्रामस्वच्छता, मूल्यशिक्षण, व्यक्तिमत्व विकास, पर्यावरण संवर्धन, वनसंवर्धन, जलसंवर्धन, ग्रामसर्वेक्षण, महिला सबलीकरण, स्त्री-पुरुष समानता, आपत्ती व्यवस्थापन, व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा निर्मूलन, आरोग्यसंवर्धन, वनराई बंधा-यांची निर्मिती, रस्त्यांची दुरुस्ती, वृक्षारोपन, हागणदारी मुक्त गाव जनजागृती इ. विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. या कामामध्ये ग्रामस्थांचाही प्रत्यक्ष सहभाग मिळाला.

शिबीर काळात देवस्थान थापलिंग मंदिराचा परिसर व बैलगाडा घाट व रस्ता याची कामे केली. त्यासाठी ग्रामस्थांचाही सहभाग मिळाला. त्यांचप्रमाणे गावातील मंदिराची स्वच्छता केली.

नागापूर परिसरातील वाड्या-वस्त्यांची स्वच्छताही ग्रामस्वच्छता उपक्रमांतर्गत करण्यात आली. यावेळी स्वच्छतेचे व स्वच्छतागृहाची गावात परिसर स्वच्छ केला. व स्वच्छतागृहाचे महत्व स्वयंसेवकांनी घराघरांमध्ये जाऊन सांगितले. त्यांमुळे नागापूर हे गाव १०० टक्के हागणदारी मुक्त झाले. त्याला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबीर काळात गावातील मुख्य चौकापासून ते स्माशनभूमीपर्यंत रस्त्याच्या दुतर्फा बदाम, अशोका, चिंच, नारळ, आंबा, जांभुळ इ. ९० झाडांची स्वच्छता करण्यात आली. जुन्या झाडांना आळी करून खतपाणी घालण्यात आले. पाणीपुरवठ्याच्या जागा स्मशानभूमी, मंदिरे या ठिकाणी स्वच्छता अभियान राबविले सरकारी दवाखाना, पाणी शुध्दीकरण प्रकल्प परिसर स्वच्छ करून शिबीरकाळात गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या परिसरातील झाडांना आळी करून पाणी घातले व रंग दिला.

Scanned with CamScanner

शिबीर काळात गावातील शाळेच्या मागिल नागेश्वर, जिर्णोधार परिसर स्वच्छता केली. नागापूर परिसरातील घरोघरी जाऊन स्वयंसेवकांनी कुटूंबाचे आर्थिक व सामाजिक कोव्हिड–१९ चे सर्व्हेक्षण केले. त्यामुळे गावच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक जीवनाची माहिती उपलब्ध झाली आहे. व्यवसायानिमित्त बाहेरगावी असलेल्या ग्रामस्थांनी शिबीरास भेट दिली.

शिबीर काळात विविध मान्यवरांची प्रबोधनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये डॉ. जमादार आर जे. डॉ. श्रीकांत फुलसुंदर यांचे एन एस एस मधून व्यक्तिमत्व विकास यांचे चंदन शेती श्री. दिपेश सर व श्री. वैभव पोखरकर यांचे माध्यमाचा समाजावर होणारा परिणाम, श्री. शाकुराव कोरडे यांचे व्यक्तिमत्व विकास व अनित केंगार यांचे भारूड हे समाज परिवर्तनाचे माध्यम यांची उद्‌बोधनपूर्ण व्याख्याने झाली. शिबीर काळात महाविद्यालय विकास समितीचे सदस्य तसेच आंबेगाव तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते यांनी भेट देऊन हितगुज साधले..

सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये मनोरंजनातून सोलापूर विद्यापीठातील श्री. अनिल केंगार यांचा भारूडाचा कार्यक्रम समालप्रबोधनासाठी व अंधश्रध्दा निर्मूलनासाठी उपयोगी पडला तसेच व्यसनमुक्ती, एड्स विरोधी जाणीव जागृती, पर्यावरण व जलसंवर्धन, आपत्ती व्यवस्थापन, हगणदारी मुक्त गाव, स्त्रीभ्रूण हत्याविरोधी जागृती, स्त्री - पुरूष समानता जाणीव जागृती, वृक्षलागवड, हुंडाबंदी, शेतक-यांच्या आत्महत्या, तंत्रज्ञानाचा अतिरेक वापर, नोटाबंदी फायदा की तोटा, शेतकरी कर्ज व आत्महात्या इत्यादी विषयातून समाजजागृती व समाज प्रबोधन करण्याचे काम स्वयंसेवकांनी केले. व अंधश्रध्दा व विज्ञान या विषयावर श्री. प्रकाश शिरोळेकर यांचे समाजप्रबोधन व्याख्यान झाले.

वादविवाद स्पर्धा व पोस्ट संकलन शिबीर काळात स्वच्छ भारत अभियान, स्त्रीभ्रूण हत्या, पाणी आडवा पाणी जिरवा, हुंडाबळी, स्त्री – पुरूष समानता, व्यसनमुक्ती, एड्स विरोधी जाणीवजागृती, हगणदारी मुक्त गाव इ. विषयांवर स्वयंसेवकांनी गावातील चौकामध्ये पथनाट्ये सादर करून ग्रामस्थांचा प्रतिसाद मिळविला. शिबीराचा समारोप कार्यक्रमासाठी श्री. देवदत्त निकम (सभापती आंबेगाव ता.) श्री. सुनिल शिंदे , सरपंच, श्री. बाळासाहेब बाणखिले, बाळासाहेब बेंडे पाटील, श्री. मधूकर वाघ,

या सर्व प्रक्रिमध्ये प्राचार्य डॉ. के.डी. कानडे ऑफिस प्रमुख श्री. पारधी सर व सर्व कार्यक्रम अधिकारी व सदस्य यांचे सहकार्य मिळाले.

**कार्यक्रम अधिकारी**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर (पुणे)**

**प्राचार्य**
**अण्णासाहेब आवटे आर्टस्, कॉमर्स व**
**हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज,**
**मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे.**

Scanned with CamScanner

रयत शिक्षण संस्थेचे,

# अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर,

# राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम

## अहवाल सन २०२१–२०२२

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये आमच्या महाविलयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाला ३ युनिटे मंजूर केलेली होती. त्यावर तीन कार्यक्रम अधिका.यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार १२८ स्वयंसेवक व १७२ स्वयंसेविका असे एकूण ३०० स्वंयसेवक सहभागी झाले होते भारत देषाला ग्रीनीज वर्ल्ड रेकॉड मिळाले. त्यामुध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना मार्फत महाविद्यालयातील १२७ स्वयंसेकांनी भाग घेतला व आळंदी येथे दोन दिवस ५० स्वयंसेवकांनी स्वच्छता केली.

नियमित कार्यक्रकांतर्गत आमच्या महाविलयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने विविध समालोपयोगी उपक्रम राबविले नियमित कार्यक्रमाचे उदघाटन डॉ. रामलाल कटारिया व डॉ. मोहन साळी यांच्या हस्ते झाले नियमित उपक्रमांमध्ये कॉलेज कॅम्पसमध्ये महाविलयाच्या नर्सरीमधील आंबा, चिंच, जांभूळ, वड , पिंपळ, सप्तपर्णी इ. प्रकारच्या ३५० वेगवेगळ्या झाडांची वृक्ष लागवड करुन स्वच्छता या वर्षी स्वयंसेवकांनी केली आहे व त्याचे जतन करण्याचे काम नियमितपणे सुरु आहे. तसेच कॉलेज कॅटिंग ते मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूस सप्तपर्णी झाडांना पाणी घालण्याचे काम केले कॉलेज कॅम्पस स्वच्छतेबरोबर विविध समाजोपयोगी व समाज प्रबोधनाच्या रॅलीही आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये हुतात्मा बाबू गेनू ज्योत रॅली कर्मवीर भाऊराव पाटील जयंती , रस्ता सुरक्षा अभियान इत्यादी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होत.

महाविद्यालयामध्ये २१ जून रोजी जागतिक योगतिक योगदिन कार्यक्रमामध्ये ऑनलाईन पध्दतीने सहभाग घेतला दि १२ ऑगस्ट २०२१ रोजी क्रांतीदिन साजरा केला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे दिनांक १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्रदिनाच्या दिवसी वृक्षलागवड स्वच्छता , केली.

वृक्षा संवर्धन श्रमाचे महत्व व्यवसमुक्ती,स्त्रीभृणहत्या विरोधी जनजागृती प्र्यावरण व जलसंवर्धन रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत वाहतुकीचे नियमन व नियोजन , आपत्कालिन व्यवस्थापन , महाविद्यालयाच्या परिसरात प्लॅस्टिक फ्री परीसर मोहिम राबवली.

राष्ट्रीय सेवा योजना विभागडून महाविद्यालयात विविध महात्म्यांच्या जयंती व पुण्यतिथीच्या कार्यक्रमाविही दरवर्षीप्रमाणे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २ ऑक्टोंबर २०२१ रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त महाविद्यालय परीसराची स्वच्छता केली.

Scanned with CamScanner

महाविद्यालयामध्ये मतदान जनजागृतीचे सर्वात मोठे काम राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून केले गेले त्यामध्ये महाविद्यालयामध्ये ऑनलाईन लशीकरण नोंदणी मोहिम राबविले व ४ वेळा लशीकरण कॅम्प आयोजित केला.

स्वयंसेवकांनी शासकीय जनकल्याण योजनचे माहिती पटनाट्य द्वारे अवसरी बु व अवसरी खुर्द , पेठ,कळंब, घोडेगांव, मंचर या ठिकाणी सादर केले.

सावित्रीबाई पुणे विद्यापीठ एसआरडी व एनआरडी कॅम्पमध्ये दोन स्वयंसेवक सहभागी झाले. मोहळ कॉलेज शिबीरात तीन स्वयंसेवक, विद्यापीठात तीन स्वयंसेवक, नारायणगाव जलसाक्षरता बारा स्वयंसेवक सहभागी झाले अशा प्रकारे एनएसएस विभागकडून सामाजिक बांधिलकी जपण्याचे उपक्रम सातत्याने सुरु आहे. वरील उपक्रमात या सर्व प्रक्रिमध्ये प्राचार्य डॉ. के.डी. कानडे ऑफिस प्रमुख श्री. पारधी सर व सर्व कार्यक्रम अधिकारी व सदस्य यांचे सहकार्य मिळाले.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर (पुणे)

Principal
Annasaheb Awate College,
Manchar, Dist.Pune

Scanned with CamScanner